# अर्थ समिती सभा दिनांक ०७.१०.२०१६
## इतिवृत्त भाग -१

| अ.क्रं. | सभेस उपस्थित पदाधिकारी | सभेस उपस्थित अधिकारी व कर्मचारी |
|---|---|---|
| १) | **मा.श्री.सचिन गजानन पाटील, सभापती, अर्थ समिती, जि.प.पालघर** | १) श्री. एस.पी.पतंगे, सचिव तथा मु.ले.व वि.अ., जि.प.पालघर |
| २) | मा. श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्य | २) श्री. पी.के.कोरडे,स.ले.अ, वित्त विभाग |
| ३) | मा. श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्य | ३) श्री. एस.आर.वंजारी, स.ले.अ., वित्त विभाग |
| ४) | मा. श्रीम.चित्रा ह्रदयनाथ किणी, सदस्य | ४) श्री. सतिश साबळे, क.ले.अ, वित्त विभाग |
| ५) | मा. श्री. चेतन दिलीप धोडी, सदस्य | ५) श्री. जी. वाय. कांबळे, स.ले.अ. पाणी पुरवठा |
| ६) | मा. श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्य | ६) श्री.अ.रा.चव्हाण, सलेअ, ल.पा./बांधकाम |
| ७) | मा. श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्य | ७) श्री.आर.वाय.मौळे, स.ले.अ, समाजकल्याण विभाग |
| ८) | मा. श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्य | ८) श्री.एस.बी.शिरोसे, आरोग्य विभाग. |
| ९) | मा. श्री.किशोर बारकू बरड, सदस्य | |

माहे ऑक्टोंबर २०१६ ची अर्थ समिती सभा शुक्रवार, दिनांक ०७.१०.२०१६ रोजी, स.११.३० वाजता मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात आयोजती करणेत आली होती. त्यानुसार दिनांक ०७.१०.२०१६ रोजी, स.११.३० वाजता सभा सुरू करण्यात आली. प्रथम मा.श्री.सचिन गजानन पाटील सभापती अर्थ समिती, जि.प.पालघर यांनी उपस्थित सर्व सन्माननीय अर्थ समिती सदस्यांचे स्वागत करून समिती सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांना सभेचे कामकाज सुरु करणेस सांगितले.

त्यानुसार सभेचे सचिव श्री.एस.पी.पतंगे यांनी मा.सभापती यांच्या परवानगीने सभेचे विषय निहाय कामकाज सुरु केले.

**<u>विषय क्रं. १.</u>**

**(अ) मागिल अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.**

अर्थ समिती सभा दिनांक १४.०९.२०१६ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सभागृहात सांगितले. याप्रमाणे दिनांक १४.०९.२०१६ च्या इतिवृतामध्ये सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्याने इतिवृतास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**(ब) मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अमंलबजावणी बाबत.**

दिनांक १४.०९.२०१६ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

**विषय क्रं. २.**

**जिल्हा परिषद पालघरचा माहे जुलै २०१६ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून अर्थ समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.**

पालघर जिल्हा परिषदेचे माहे जुलै २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत. अर्थ समितीचे सचिव श्री.एस.पी.पतंगे यांनी सदर जमा खर्च तक्यांमधील योजनांबाबत लेखाशिर्ष निहाय सविस्तर जमा व खर्चाची माहिती सभागृहास दिली.

सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे जुलै २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली.

**विषय क्र. ३.**

**मा. सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.**

**जिल्हा परिषद अंतर्गत विभाग प्रमुखांकडील विविध विकास योजनांचा आढावा.**

सभेस कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व पाटबंधारे तसेच बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, समाजकल्याण विभागांचे प्रतीनिधी उपस्थित होते. सभापती व सन्माननीय अर्थ समिती सदस्य यांनी संबंधित विभागांकडील विकास योजनांचा आढावा घेतला.

सभेपुढे चर्चेकरीता अन्य विषय नसल्याने सचिव श्री. संजय पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा.सभापती यांचे परवानगीने सभेस उपस्थित अर्थ समिती सदस्य, विभाग प्रमुख व त्यांचे प्रती निधी यांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा. सभापती,**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष**
**जिल्हा परिषद पालघर**

# अर्थ समिती सभा दिनांक ०७.१०.२०१६
## इतिवृत्त भाग -२

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| बुधवार, दिनांक १४.०९.२०१६ रोजी, स. ११.३० वा | **विषय क्र.१ (अ) मागिल सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.** | अर्थ समिती सभा दिनांक १४.०९.२०१६ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सुचविले. दिनांक १४.०९.२०१६ च्या इतिवृत्तामध्ये दुरूस्ती सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्यामुळे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | मा.श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्या.<br><br>मा.श्रीम.रंजना किशोर संख्ये, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ४१ |
| | **विषय क्र.१ (ब) मागील ठरावाच्या अमंलबजावणी बाबत.** | दिनांक १४.०९.२०१६ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा.सदस्यांनी सहमती दर्शविली. | मा.श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्या.<br><br>मा.श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | -- |

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| | **विषय क्रं .२ .**<br>**जिल्हा परिषद पालघरचा माहे जुलै २०१६ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून अर्थ समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.** | पालघर जिल्हा परिषदेचे माहे जुलै २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत. अर्थ समितीचे सचिव श्री.एस.पी. पतंगे यांनी सदर जमा खर्च तक्त्यांमधील योजनांबाबत लेखाशिर्ष निहाय सविस्तर जमा व खर्चाची माहिती सभागृहास दिली.<br>सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे जुलै २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली. | मा.श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्या.<br><br>मा.श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्या. | -- | -- | -- | ४२ |

सचिव अर्थ समिती
तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

मा.सभापती
अर्थ समिती तथा उपाध्यक्ष,
जिल्हा परिषद पालघर